भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७

(१९८७ चा अधिनियम क्रमांक ५३)

[३१ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The National Housing Bank Act, 1987

**(Act No. 53 of 1987)**

[As in force on the 31st March 1995]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी

भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९६

[किंमत : रु.        ]  ६.००

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला नॅशनल हाऊसिंग बँक ॲक्ट, १९८७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक २, दिनांक २३ नोव्हेंबर १९९५ यात पृष्ठ ९८ ते ११४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २३ नोव्हेंबर १९९५.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the National Housing Bank Act, 1987 on the 31st March 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 6, dated 23rd November 1995 on pages 98 to 114.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 23rd November 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७

## कलमांचा क्रम

### प्रकरण एक

#### प्रारंभिक


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची स्थापना व तिचे भांडवल

३. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची स्थापना आणि तिचे विधीद्वारे संस्थापन.

४. भांडवल.

प्रकरण तीन

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे व्यवस्थापन

५. व्यवस्थापन.

६. संचालक मंडळ.

७. अध्यक्ष, व्यवस्थापन संचालक आणि इतर संचालक यांचा पदावधी आणि सेवाशर्ती, इत्यादी.

८. अनर्हता.

९. संचालकांनी पद रिक्त करणे किंवा राजीनामा देणे.

१०. अध्यक्ष किंवा व्यवस्थापन संचालक यांच्या पदांची प्रासंगिक रिक्तता.

११. मंडळाच्या बैठकी.

१२. कार्यकारी समिती व इतर समित्या.

१३. विवक्षित प्रकरणांमध्ये मंडळाच्या संचालकांनी किंवा त्याच्या समितीच्या सदस्यांनी बैठकी-मध्ये सहभागी न होणे.

प्रकरण चार

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे कामकाज

१४. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे कामकाज.

१५. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या उसनवाऱ्या व तिच्याकडून ठेवींचा स्वीकार.

१६. परकीय चलनातील कर्जे.

१७. अधिकार हस्तांतरित करण्याची शक्ती.

१८. अधिकार संपादित करण्याची शक्ती.

१९. कर्जव्यवस्थेसाठी शर्ती लादण्याची शक्ती.

२०. कबूल केलेल्या कालावधीपूर्वी परतफेड करण्यास फर्मावण्याची शक्ती.

२१. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला अभिलेख पाहावयास मिळणे.

२२. कर्ज किंवा अग्रिम यांच्या विधिग्राह्यतेस हरकत घेतली जाणार नाही.

२३. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने आपले स्वतःचे रोखे किंवा ऋणपत्रे यांपोटी कर्ज किंवा अग्रिमे न देणे.

२४. तपासणी करण्याची शक्ती.

२५. पतविषयक माहिती गोळा करण्याची शक्ती.

२६. माहिती प्रकाशित करण्याची शक्ती.

२७. सल्लाविषयक सेवा.

## प्रकरण पाच

### ठेवी स्वीकारणाऱ्या गृहनिर्माण वित्तीय संस्थांसंबंधीचे उपबंध

२८. ठेवीची व्याख्या.

२९. प्रकरण विवक्षित बाबतीत लागू होणार नाही.

३०. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने, पैशाच्या ठेवींची अभ्यर्थना करणारे उद्देशपत्रक किंवा जाहिरात काढणे या गोष्टींचे विनियमन किंवा त्यास मनाई करणे.

३१. गृहनिर्माण वित्तीय संस्थांकडून ठेवींसंबंधी माहिती गोळा करण्याची आणि निदेश देण्याची राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची शक्ती.

३२. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून आवश्यक करण्यात आलेली विवरणपत्रे इत्यादी सादर करणे हे गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांचे कर्तव्य असणे.

३३. लेखापरीक्षकांच्या शक्ती व कर्तव्य.

३४. निरीक्षण.

३५. अनधिकृत व्यक्तींना ठेवींची अभ्यर्थना करता येणार नाही.

३६. प्रकरण ५ हे इतर कायद्यांवर अधिभावी ठरणे.

## प्रकरण सहा

### निधी, लेखे व लेखापरीक्षा

३७. सर्वसाधारण निधी व इतर निधी.

३८. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे ताळेबंद इत्यादी तयार करणे.

३९. अधिशेषाची व्यवस्था लावणे.

४०. लेखापरीक्षा.

४१. विवरणे.

४२. गृहनिर्माणावरील वार्षिक अहवाल.

## प्रकरण सात

### संकीर्ण

४३. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचा कर्मचारी वर्ग.

४४. प्रामाणिकता व गुप्तता याबाबतचे आबंधन.

४५. नियुक्तीमधील दोषांमुळे कृती इत्यादी विधिबाह्य ठरणार नाहीत.

४६. या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.

४७ संचालकांचे हानिरक्षण

४८. प्राप्तीवरील करापासून सूट.

४९. शास्ती.

५०. कंपन्यांचे अपराध.

५१. अपराधांची दखल.

५२. द्रव्यदंडाचे उपयोजन.

५३. बँक व्यवसायींची पुस्तके, पुरावा अधिनियम, १८९१ राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या संदर्भात लागू होणे.

५४. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे समापन.

५५. विनियम करण्याची मंडळाची शक्ती.

५६. विवक्षित अधिनियमितीचे विशोधन.

५७. अडचणी दूर करण्याची शक्ती.

# राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७

**(सन १९८७ चा अधिनियम क्रमांक ५३)**

(दिनांक ३१ मार्च, १९९५ रोजी यथाविद्यमान)

(२३ डिसेंबर, १९८७)

**गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांचे स्थानिक व प्रादेशिक अशा दोन्ही पातळ्यांवर प्रवर्धन करण्यासाठी आणि अशा संस्थांना वित्तीय व इतर पाठबळ देण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबींसाठी मुख्य अभिकर्ता म्हणून कार्य करणारी राष्ट्रीय गृहनिर्माण बँक या नावाने ओळखली जाणारी एक बँक स्थापन करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या अडतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर असेल.

(३) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास* तो अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील आणि कोणत्याही उपबंधातील या अधिनियमाच्या प्रारंभाच्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ, तो उपबंध अंमलात येण्याचा संदर्भ असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "मंडळ" याचा अर्थ, कलम ६ मध्ये निर्देशिलेले राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे संचालक मंडळ, असा आहे ;

(ख) "अध्यक्ष" याचा अर्थ, कलम ६ अन्वये नियुक्त केलेल्या मंडळाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) "संचालक" याचा अर्थ, कलम ६ अन्वये नियुक्त केलेला संचालक, असा आहे ;

(घ) "गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्था" यामध्ये, मूलतः गृहनिर्माणासाठी प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे वित्तव्यवस्था करण्याचा व्यवहार करणाऱ्या किंवा तसा मुख्य उद्देश असणाऱ्या प्रत्येक संस्थेचा, मग ती निगमित असो वा नसो, समावेश होतो ;

(ङ) "व्यवस्थापन संचालक" याचा अर्थ, कलम ६ अन्वये नियुक्त केलेला व्यवस्थापन संचालक, असा आहे ;

(च) "राष्ट्रीय गृहनिर्माण बँक" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेली राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, असा आहे ;

(छ) "अधिसूचना" याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित झालेली अधिसूचना, असा आहे ;

(ज) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या विनियमांद्वारे विहित, असा आहे ;

(झ) "रिझर्व्ह बँक" याचा अर्थ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या कलम ३ अन्वये घटित केलेली रिझर्व्ह बँक, असा आहे ;

(ञ) यात वापरलेले आणि व्याख्या न केलेले परंतु रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे त्या अधिनियमात नेमून दिलेले अर्थ असतील;

(ट) यात वापरलेले आणि या अधिनियमात किंवा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) यामध्येही व्याख्या न केलेले परंतु, बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) यामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ मध्ये नेमून दिलेले अर्थ असतील.

---

* ९ जुलै १९८८-प्रकरण ५ आणि कलम ४९ (३) खेरीजकरून—पहा का. आ. (६३४)
(ग) दिनांक ९ जुलै १९८८. १ जून १९८९-प्रकरण ५ आणि कलम ४९ (३) पहा—का. आ. ३९४
(अ) दिनांक १ जून १९८९.

## प्रकरण दोन

### राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची स्थापना व तिचे भांडवल

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची स्थापना आणि तिचे विधीद्वारे संस्थापन.

३. (१) केंद्र शासन अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक म्हणून ओळखली जाणारी एक बँक स्थापन करण्यात येईल.

(२) राष्ट्रीय गृहनिर्माण बँक ही, उपरोक्त नावाचा, अखंड परंपरा असलेला व सामान्य मुद्रा असलेला एक निगम निकाय असेल आणि त्याच्याकडे या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, संपत्ती संपादित करण्याची, ती धारण करण्याची व निकालात काढण्याची आणि संविदा करण्याची शक्ती असेल आणि त्याला त्या नावाने दावा लावता येईल व त्याच्यावर त्या नावाने दावा लावला जाऊ शकेल.

(३) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे मुख्य कार्यालय, मुंबई येथे किंवा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही ठिकाणी असेल.

(४) राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, भारतातील कोणत्याही ठिकाणी आणि रिझर्व्ह बँकेच्या पूर्वमान्यतेने भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणी कार्यालये, शाखा किंवा एजन्सी स्थापन करू शकेल.

भांडवल.

४. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे प्राधिकृत आणि भरणा केलेले भांडवल शंभर कोटी रुपये असेल आणि रिझर्व्ह बँक त्याला अंशदान देईल :

परंतु, केंद्र शासनाला, रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय करून, अधिसूचनेद्वारे उक्त भांडवल पाचशे कोटी रुपयांपर्यंत वाढवता येईल आणि अशा वाढवलेल्या भांडवलालाही रिझर्व्ह बँक अंशदान करील.

## प्रकरण तीन

### राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे व्यवस्थापन

व्यवस्थापन.

५. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे सर्व व्यवहार आणि कामकाज यांचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन, संचालक मंडळाकडे निहित असेल आणि ते, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला वापरता येतील त्या सर्व शक्तींचा वापर करील किंवा तिला करता येतील त्या सर्व कृती किंवा गोष्टी करील.

(२) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, मंडळ, आपली कर्तव्ये पार पाडीत असताना, सार्वजनिक हित वाजवीरीत्या लक्षात घेऊन, कामकाजाच्या तत्त्वानुसार कार्य करील.

(३) पोटकलम (१) च्या उपबंधांच्या अधीनतेने आणि या अधिनियमान्वये केलेल्या विनियमांमध्ये उपबंधित केले असेल ते खेरीजकरून,—

(क) अध्यक्षाला, त्याने अध्यक्ष व व्यवस्थापन संचालक अशी दोन्ही पदे धारण केली असल्यास, किंवा

(ख) व्यवस्थापन संचालकाला, अध्यक्ष अनुपस्थित असल्यास,—

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या व्यवहारांचे व कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन करण्याच्याही शक्ती असतील आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँक वापर करू शकेल अशा सर्व शक्तींचा तो वापर करील किंवा ती करू शकेल अशा कृती व गोष्टी तो करील आणि सार्वजनिक हित वाजवीरीत्या लक्षात घेऊन, कामकाजाच्या तत्त्वानुसार तो कार्य करील.

(४) व्यवस्थापन संचालक, आपल्या शक्तींचा वापर करताना आणि कर्तव्ये पार पाडताना, अध्यक्ष देईल अशा निदेशांचे पालन करील.

(५) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, या अधिनियमान्वये आपली कर्तव्ये पार पाडताना, लोकहित ज्यामध्ये गुंतलेले असेल अशा धोरणात्मक बाबींसाठी, केंद्र शासन, रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय केल्यानंतर लेखी देईल अशा किंवा रिझर्व्ह बँक लेखी देईल अशा, निदेशांद्वारे मार्गदर्शन करण्यात येईल.

संचालक मंडळ.

६. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे संचालक मंडळ खालीलप्रमाणे बनलेले असेल, ते असे:—

(क) एक अध्यक्ष व एक व्यवस्थापन संचालक :

परंतु, अध्यक्ष व व्यवस्थापन संचालक म्हणून एकाच व्यक्तीची नियुक्ती करता येईल;

(ख) गृहनिर्माण, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी, समाजशास्त्र, वित्त, कायदा, व्यवस्थापन व निगम नियोजन या क्षेत्रातील किंवा ज्याचे विशेष ज्ञान राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला उपयोगी वाटेल अशा अन्य कोणत्याही क्षेत्रातील तज्ज्ञांमधून तीन संचालक;

(ग) गृहनिर्माणासाठी निधी पुरविण्याचे कार्य करणाऱ्या किंवा गृहनिर्माण विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांच्या कामाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून तीन संचालक;

(घ) रिझर्व्ह बँकेच्या संचालकांमधून दोन संचालक;

(ङ) केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांमधून तीन व्यक्ती संचालक म्हणून;

(च) राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांमधून दोन व्यक्ती संचालक म्हणून;

(२) संचालक, व्यवस्थापन संचालक आणि खंड (घ) मध्ये निर्देशिलेले संचालक वगळून, इतर संचालक, यांची नियुक्ती केंद्र शासनाकडून, रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय केल्यानंतर, करण्यात येईल आणि खंड (घ) मध्ये निर्देशिलेले संचालक, रिझर्व्ह बँकेकडून नामनिर्देशित करण्यात येतील.

७. (१) अध्यक्ष आणि व्यवस्थापन संचालक, पाच वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधी-साठी पद धारण करतील आणि त्यांना, केंद्र शासन रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय करून विनिर्दिष्ट करील असे, वेतन व भत्ते मिळतील आणि अशा सेवाशर्ती व अटी त्यांना लागू असतील आणि ते पुनर्नियुक्तीस पात्र असतील : अध्यक्ष, व्यवस्थापन संचालक आणि इतर संचालक यांचा पदावधी आणि सेवाशर्ती, इ.

परंतु, अध्यक्ष, किंवा प्रकरणपरत्वे, व्यवस्थापन संचालक, त्याचा पदावधी संपला तरीही, त्याचा उत्तराधिकारी त्याच्या पदावर येईपर्यंत पदग्रहण करणे चालू ठेवील.

(२) कलम ६ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) व (ग) मध्ये निर्देशिलेले संचालक, तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत पद धारण करतील :

परंतु, असा कोणताही संचालक, त्याचा पदावधी संपला तरीही त्याचा उत्तराधिकारी पदावर येई पर्यंत पदग्रहण करणे चालू ठेवील.

(३) केंद्र शासनाला, रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय केल्यानंतर, संचालक किंवा व्यवस्थापन संचालक किंवा पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेला अन्य कोणताही संचालक याला, त्याचा पदावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी, तशाप्रकारे काढून टाकण्याचे प्रस्तावित असताना त्याबद्दल कारण दाखवण्याची त्याला वाजवी संधी देऊन काढून टाकता येईल.

(४) पोटकलमे (१) व (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासनाला, रिझर्व्ह बँकेशी विचारविनिमय केल्यानंतर, अध्यक्ष, किंवा प्रकरणपरत्वे, व्यवस्थापन संचालक, यांचा पदावधी, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला अवधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी, त्याला किमान तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन, किंवा त्याऐवजी तीन महिन्यांचे वेतन व भत्ते देऊन, समापित करण्याचा अधिकार असेल आणि अध्यक्ष, किंवा प्रकरणपरत्वे, व्यवस्थापन संचालक यालाही, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अवधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी, केंद्र शासनाला किमान तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन किंवा त्याऐवजी तीन महिन्यांचे वेतन व भत्ते परत करून, आपले पद सोडून देता येईल.

(५) मंडळाच्या बैठकींना किंवा मंडळाच्या समित्यांपैकी कोणत्याही समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या अन्य कोणत्याही कामाबद्दल संचालकांना विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते देण्यात येतील :

परंतु, जो शासनाचा पदधारक असेल अशा किंवा रिझर्व्ह बँकेचा संचालक असेल अशा कोणत्याही संचालकाला अशी कोणतीही फी प्रदेय असणार नाही.

८. (क) जी विकल मनाची आहे किंवा होते आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल; किंवा अनर्हता.

(ख) जिला, केंद्र शासनाच्या मते, ज्याला नैतिक अधोगती म्हणता येईल अशा कोणत्याही अपराधा-बद्दल सिद्धदोष ठरवण्यात आले असेल किंवा ठरवण्यात येईल; किंवा

(ग) जी नादार म्हणून अभिनिर्णीत आहे किंवा कोणत्याही वेळी अभिनिर्णीत करण्यात आली असेल किंवा तिच्या ऋणाचे प्रदान निलंबित ठेवले असेल किंवा तिच्या धनकोबरोबर आपसाती केलेली असेल; किंवा

(घ) जिला कोणत्याही कारणावरून,—

(एक) शासनाच्या, किंवा

(दोन) रिझर्व्ह बँकेच्या, स्टेट बँकेच्या किंवा अन्य कोणत्याही बँकेच्या, किंवा

(तीन) कोणत्याही सार्वजनिक वित्तीय संस्थेच्या किंवा राज्य वित्तीय महामंडळाच्या, किंवा

(चार) शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून नियंत्रित होणाऱ्या अन्य कोणत्याही महामंडळाच्या सेवेतून काढून टाकण्यात किंवा बडतर्फ करण्यात आले आहे,

अशी कोणतीही व्यक्ती मंडळाचा संचालक असणार नाही.

९. (१) जर एखादा संचालक,— संचालकांनी पद रिक्त करणे किंवा राजीनामा देणे.

(क) कलम ८ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अनर्हतेच्या अधीन असेल; किंवा

(ख) मंडळाच्या तीन किंवा अधिक क्रमवर्ती बैठकींना मंडळाच्या परवानगीविना अनुपस्थित असेल, तर त्यानंतर त्याचे पद रिक्त होईल.

(२) कोणत्याही संचालकाला, ज्या प्राधिकरणाने त्याला नियुक्त केले, किंवा प्रकरणपरत्वे, नामनिर्देशित केले असेल त्याला त्याबद्दल लेखी नोटीस देऊन, त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल आणि अशा प्राधिकरणाकडून त्याचा राजीनामा स्वीकारण्यात आल्यानंतर किंवा त्याचा राजीनामा लवकर स्वीकारण्यात आला नाही तर, अशा नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून तो स्वीकारण्यात आल्यापासून तीन महिन्यांचा कालावधी संपताच, त्याने त्याचे पद रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल.

अध्यक्ष किंवा व्यवस्थापन संचालक यांच्या पदांची प्रासंगिक रिक्तता.

१०. अध्यक्ष, किंवा प्रकरणपरत्वे, व्यवस्थापन संचालक, विकलतेमुळे किंवा अन्यथा त्याची कर्तव्ये पार पाडण्यात असमर्थ ठरल्यास किंवा तो रजेनिमित्त वा अन्यथा अनुपस्थित असल्यास त्याची नियुक्ती रिक्त ठरत नसेल, अशा परिस्थितीत केंद्र शासनाला, त्याच्या अनुपस्थितीत कार्य करण्यासाठी अन्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

मंडळाच्या बैठकी.

११. (१) मंडळाच्या बैठकी विहित करण्यात येतील अशा वेळांमध्ये आणि अशा ठिकाणी होतील आणि कामकाजाच्या व्यवहारासंबंधात विहित करण्यात येईल त्याप्रमाणे ते आपल्या बैठकींमध्ये तशा कार्यपद्धती नियमांचे अनुपालन करील.

(२) अध्यक्ष, किंवा कोणत्याही कारणामुळे मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहणे अध्यक्षाला शक्य नसल्यास, व्यवस्थापन संचालक, किंवा अध्यक्ष व व्यवस्थापन संचालक या दोघांनाही बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसल्यास, अध्यक्षाने यासंबंधात नामनिर्देशित केलेला कोणताही अन्य संचालक आणि अशा नामनिर्देशनाअभावी बैठकीस उपस्थित असलेल्या संचालकांनी त्यांच्यामधूनच निवडून दिलेला कोणताही संचालक, बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील.

(३) मंडळाच्या कोणत्याही बैठकीपुढे येणाऱ्या सर्व प्रश्नांसंबंधात उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या संचालकांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल आणि मते समान असल्यास, अध्यक्षाला किंवा त्याच्या अनुपस्थितीत अध्यक्षस्थानी असलेल्या व्यक्तीला दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

कार्यकारी समिती व इतर समित्या.

१२. (१) मंडळाला, विहित करण्यात येईल इतक्या संचालकांची कार्यकारी समिती घटित करता येईल.

(२) कार्यकारी समिती, मंडळाकडून विहित करण्यात येतील अशी किंवा प्रत्यायोजित करण्यात येतील अशी कर्तव्ये पार पाडील.

(३) मंडळाला, ते ठरवील अशा प्रयोजनांसाठी, त्याला योग्य वाटतील अशा संपूर्णपणे संचालक किंवा संपूर्णपणे इतर व्यक्ती किंवा काही संचालक व काही इतर व्यक्ती यांचा समावेश असलेल्या अशा इतर समित्या घटित करता येतील आणि अशा रीतीने घटित झालेली कोणतीही समिती मंडळाकडून प्रत्यायोजित करण्यात येतील अशी कर्तव्ये पार पाडील.

(४) कार्यकारी समिती किंवा या कलमान्वये घटित केलेल्या अन्य कोणत्याही समित्या, विहित करण्यात येईल अशा वेळांमध्ये व ठिकाणी आपल्या बैठकी घेतील आणि बैठकीतील कामकाजविषयक नियमांचे अनुपालन करतील.

विवक्षित प्रकरणामध्ये मंडळाच्या संचालकांनी किंवा त्याच्या समितीच्या सदस्यांनी सहभागी न होणे.

१३. मंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या बैठकीपुढे विचारार्थ येणाऱ्या कोणत्याही बाबतीत कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आर्थिक हितसंबंध असणारा मंडळाचा कोणताही संचालक किंवा कोणताही सदस्य संबद्ध परिस्थितीचे आकलन होताच शक्य तितक्या लवकर, अशा बैठकीमध्ये त्याच्या हितसंबंधाचे स्वरूप उघड करील आणि मंडळाच्या, किंवा प्रकरणपरत्वे, समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तात त्याबद्दल नोंद करण्यात येईल आणि संचालक किंवा सदस्य त्या बाबीसंबंधातील मंडळाच्या किंवा समितीच्या कोणत्याही बोलण्यांमध्ये किंवा निर्णयांमध्ये सहभागी होणार नाही.

## प्रकरण चार

### राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे कामकाज

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे कामकाज.

१४. या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला खालील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही पकारचे कामकाज चालविता येईल, ते असे,—

(क) गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांचे प्रवर्धन, स्थापना व त्यांना पाठबळ देणे किंवा प्रवर्धन करण, स्थापना करणे व पाठबळ देण यांमध्ये सहाय्य करणे ;

(ख) गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्था व अनुसूचित बँका [1][ किंवा केंद्रीय, राज्य किंव, प्रांतीय अधिनियमांच्या द्वारे किंवा अन्वये स्थापित झालेले कोणतेही प्राधिकरण आणि जे गलिच्छ, वस्ती निर्मूलनामध्ये गुंतलेले आहे.) यांना कर्जे व अग्रिमे देणे किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचे वित्तीय सहाय्य देणे ;

(ग) पुंजरोखे, शेअर्स, बंधपत्रे, ऋणपत्रे व इतर प्रत्येक प्रकारचे रोखे यांसाठी अंशदान करणे किंवा ते खरेदी करणे ;

---

१. १९९१ चा अधिनियम ४७, कलम-५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(घ) गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांच्या वित्तीय दायित्वासाठी हमी देणे आणि गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांचे पुंजरोखे, भागपत्रे, बंधपत्रे, ऋणपत्रे व इतर प्रत्येक प्रकारचे रोखे काढण्यासाठी हमी देणे ;

(ङ) विनिमयपत्रे, वचनचिठ्ठ्या, बंधपत्रे, ऋणपत्रे, हुंड्या, कुपने आणि अन्य कोणत्याही नावे ज्ञात असलेले इतर संलेख काढणे, स्वीकारणे, वट्टयाने वटवणे किंवा पुन्हा वट्टयाने वटवणे, विकत घेणे किंवा विकणे आणि त्यांचा व्यापार करणे ;

(च) या अधिनियमाखालील सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी दुय्यम संस्थेची रचना करणे, त्यांचे प्रवर्धन व व्यवस्थापन करणे ;

(छ) निवारा, गृहनिर्माण व मानवी वसाहत यांच्याबाबतीतील किंवा संबंधित बांधकाम तंत्र यावरील संशोधन व सर्वेक्षण व इतर अभ्यास हाती घेणे ;

(ज) गृहनिर्माणासाठी साधनसंपत्ती कामी लावणे व पत वाढवणे यासाठी एक किंवा अधिक योजनांची आखणी करणे ;

[1][(जज) एच्छिक ठेवी (उन्मुक्ती आणि सूट) अधिनियम, १९९१ च्या कलम २ खंड (क) मध्ये संदर्भित केल्याप्रमाणे ठेवी स्वीकारण्याच्या प्रयोजनार्थ योजना बनविणे आणि अशा ठेवींची ४० टक्के रक्कम कलम ३७ अन्वये बनविलेल्या विशेष निधीमध्ये जमा करणे.]

(झ) समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केंद्र शासनाकडून किंवा अन्य राज्य शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही साधनांनी ज्यांना अर्थसहाय्य दिले जाईल अशा एका योजनेची किंवा अधिक योजनांची आखणी करणे ;

(ञ) गृहनिर्माणाशी संबंधित बाबींवर प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित करणे;

(ट) गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांचा विकास सुयोग्य दिशेने व्हावा यादृष्टीने त्यांना मार्गदर्शक तत्वे घालून देणे ;

(ठ) गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांना तांत्रिक व प्रशासनिक सहाय्य देणे ;

(ड) आपली एकूण कर्तव्ये पार पाडताना, भारतीय आयुर्विमा निगम, युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, भारतीय सर्वसाधारण विमा निगम व इतर वित्तीय संस्था यांचा समन्वय घालणे ;

(ढ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये राष्ट्रीय गृहनिर्माण संस्थेकडे सोपवलेली सर्व कर्तव्ये पार पाडताना सर्व शक्तींचा वापर करणे व कामे पार पाडणे ;

(ण) केंद्र शासनाचा, राज्य शासनाचा किंवा रिझर्व्ह बँकेचा किंवा रिझर्व्ह बँकेकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा कोणत्याही प्राधिकरणाचा अभिकर्ता म्हणून कार्य करणे ;

(त) केंद्र शासनाला, रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीवरून प्राधिकृत करता येईल असे अन्य कोणत्याही प्रकारचे कामकाज ;

(थ) या अधिनियमाखालील शक्तींचा वापर करताना किंवा कर्तव्ये पार पाडत असताना, सर्वसाधारणतः आनुषंगिक किंवा परिणामरूप असतील अशा सर्व बाबी व गोष्टी करणे.

**राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या उसनवारीच्या व तिच्याकडून ठेवींचा स्वीकार.**

१५. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ,—

(क) केंद्र शासनाच्या हमीसह किंवा हमीविना, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा अटींवर रोखे व ऋणपत्रे काढता व विकता येतील ;

(ख) केंद्र शासनाकडून आणि त्या शासनाकडून मान्यता देण्यात आलेले अन्य कोणतेही प्राधिकरण, संघटना किंवा संस्था यांच्याकडून, संमत होतील अशा अटी व शर्ती यांवर पैसा उसना घेता येईल ;

(ग) ठेव ठेवल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीपेक्षा कमी नसेल असा कालावधी संपल्यानंतर परतफेडयोग्य असतील अशा ठेवी रिझर्व्ह बँकेकडून सर्वसाधारणतः किंवा विशेषतः मान्य होतील अशा अटींवर स्वीकारता येतील ;

[2][परंतु कलम १४ च्या खंड (जज) च्या अनुसार बँकेद्वारे बनविलेल्या योजनेअन्वये, स्वीकारलेल्या ठेवींना या खंडातील कांहीही लागू होणार नाही.]

(घ) रिझर्व्ह बँकेकडून,—

(एक) मागणी होताच किंवा कर्ज वा अग्रिम दिल्याच्या दिनांकापासून अठरा महिन्यांपेक्षा अधिक नसेल असा निश्चित कालावधी संपताच सुरक्षा व प्रयोजन यासंबंधातील अटींसह रिझर्व्ह बँकेकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्ती यांवर ;

(दोन) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या कलम ४६ अन्वये किंवा त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय गृहनिर्माण पत (दीर्घ मुदतीची कार्ये) निधीमधून, पैसा उसना घेता येईल ;

---

१. १९९१ चा अधिनियम ४७, कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(ङ) दिलेल्या सेवांपोटी असे पारिश्रमिक, कमिशन, बांधिलकीचा आकार, सल्ला आकार, सेवा आकार, स्वामित्व धन, अधिमूल्य, लायसन फी आणि कोणत्याही प्रकारचा मोबदला घेता येईल ;

(च) शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने बक्षिसे, अनुदान, देणग्या किंवा धर्मादाय स्वीकारता येतील.

(२) केंद्र शासनाला, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून त्याला तशी विनंती करण्यात आल्यानंतर, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने काढलेले रोखे व ऋणपत्रे यांच्या मुद्दलाची परतफेड व त्या शासनाकडून निश्चित करण्यात येईल अशा व्याजाच्या दराने त्यावरील व्याज भरणे यासंबंधात हमी देता येईल.

परकीय चलनातील कर्जे.

१६. (१) परकीय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६) किंवा परकीय चलनासंबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, या अधिनियमान्वये कर्जे व अग्रिमे देण्यासाठी, रिझर्व्ह बँकेशी सल्लामसलत करून, विहित करण्यात येतील अशा रीतीने व अशा शर्तीनुसार आणि केंद्र शासनाच्या पूर्वमंजुरीने भारतातील किंवा अन्यत्र असणाऱ्या कोणत्याही बँकेकडून किंवा वित्तीय संस्थेकडून परकीय चलन उसने घेता येईल.

(२) केंद्र शासनाला, आवश्यक असेल तेथे, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने पोटकलम (१) अन्वये घेतलेले कोणतेही कर्ज किंवा त्याचा कोणताही भाग याबाबतीत, मुद्दलाची परतफेड आणि व्याज व इतर आनुषंगिक आकार भरणे यासंदर्भात हमी देता येईल.

अधिकार हस्तांतरित करण्याची शक्ती.

१७. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने दिलेले कोणतेही कर्ज किंवा अग्रिम अथवा तिच्याकडून वसुलीयोग्य कोणतीही रक्कम यासंबंधातील अधिकार (त्याला आनुषंगिक अशा कोणत्याही अधिकारासह) व हितसंबंध कोणत्याही संलेखाचे निष्पादन करून किंवा संलेख काढून अथवा पृष्ठांकनाद्वारे कोणत्याही संलेखाचे हस्तांतरण करून अथवा असे कर्ज किंवा अग्रिम यासंबंधातील अधिकार व हितसंबंध ज्याद्वारे वैध रीत्या हस्तांतरित करता येतील अशा अन्य कोणत्याही रीतीने, संपूर्णत: किंवा अंशत: राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून हस्तांतरित होऊ शकतील आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, असे हस्तांतरण झाले तरीही, भारतीय न्यास अधिनियम, १८८२ (१८८२ चा २) याच्या कलम ३ च्या अर्थांतर्गत, हस्तांतरितीसाठी विश्वस्त म्हणून कार्य करता येईल.

अधिकार संपादित करण्याची शक्ती.

१८. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, कोणत्याही गृहनिर्माण वित्तीय संस्थेचे, त्या संस्थेने दिलेले कोणतेही कर्ज किंवा अग्रिम अथवा तिच्याकडून संपूर्णत: किंवा अंशत: वसुलीयोग्य असलेली कोणतीही रक्कम, यांच्या संबंधातील कोणतेही अधिकार (त्यासंबंधातील अन्य कोणत्याही तदानुषंगिक अधिकारांसह), व हितसंबंध कोणत्याही संलेखाच्या निष्पादनाद्वारे किंवा तो काढून अथवा कोणत्याही संलेखाच्या हस्तांतरणाद्वारे किंवा अभिहस्तांकनाद्वारे अथवा असे कर्ज किंवा अग्रिम यासंबंधातील अधिकार व हितसंबंध ज्याद्वारे कायदेशीर रीत्या हस्तांतरित करता येतील अशा अन्य कोणत्याही रीतीने, संपादित करण्याचा अधिकार असेल.

कर्जव्यवस्थेसाठी शर्ती लादण्याची शक्ती.

१९. या प्रकरणान्वये कोणत्याही उसनवारी करणाऱ्या गृहनिर्माण वित्तीय संस्थेशी कोणताही संव्यवहार करताना, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी तिला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा शर्ती लादता येतील.

कबूल केलेल्या कालावधीपूर्वी परतफेड करण्यास फर्मावण्याची शक्ती.

२०. कोणत्याही करारात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला लेखी नोटीशीद्वारे, कोणत्याही उसनवारी करणाऱ्या गृहनिर्माण वित्तीय संस्थेला, खालील परिस्थितीत तिची राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेबाबतची दायित्वे, तात्काळ पूर्णपणे फेडण्याबाबत फर्मावता येईल :—

(क) कर्जासाठी किंवा अग्रिमासाठी केलेल्या अर्जात कोणत्याही महत्त्वाच्या तपशीलात खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे असे मंडळाला आढळून आले तर; किंवा

(ख) उसनवारी करणाऱ्या गृहनिर्माण वित्तीय संस्थेने, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेशी, कर्ज, किंवा अग्रिम यासंबंधात झालेल्या कराराच्या शर्तींपैकी कोणतीही शर्त पाळण्यात कसूर केली असेल तर; किंवा

(ग) उसनवारी करणारी गृहनिर्माण वित्तीय संस्था आपली कर्जे फेडण्यास असमर्थ आहे किंवा तिच्यासंबंधात समापनाची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे अशी वाजवी धास्ती वाटत असेल तर; किंवा

(घ) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी कोणत्याही कारणास्तव तसे करणे आवश्यक असेल तर.

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला अभिलेख पाहावयास मिळणे.

२१. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला तिच्याकडून पतसुविधांचा लाभ मागणाऱ्या कोणत्याही गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेचा असा सर्व अभिलेख आणि अशा गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेकडून कोणतीही पतसुविधा मागणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा असा सर्व अभिलेख सहजपणे पाहावयास मिळेल, ज्याचे लक्षपूर्वक अवलोकन अशा गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेला किंवा इतर सहाय्य देताना अथवा

त्या गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेकडून अशा व्यक्तीला देण्यात आलेल्या कोणत्याही कर्जाची किंवा अग्रिमाची पुनर्वित्तव्यवस्था करताना, आवश्यक असेल.

(२) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही संस्थेला किंवा व्यक्तीला, त्या पोटकलमात निर्देशिलेल्या कोणत्याही अभिलेखाच्या प्रती तिच्याकडे सादर करण्यास फर्मावता येईल आणि ती संस्था, किंवा प्रकरणपरत्वे, व्यक्ती अशा फर्मानाचे अनुपालन करण्यास बांधलेली असेल.

**कर्ज किंवा अग्रिम यांच्या विधिग्राह्यतेस हरकत घेतली जाणार नाही.**

२२. त्या त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाच्या उपबंधांनुसार, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या किंवा अग्रिमाच्या विधिग्राह्यतेस केवळ अशा अन्य कोणत्याही कायद्याच्या किंवा अन्य ठरावाच्या, संविदेच्या किंवा उसने घेणाऱ्या गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेच्या घटनेचे विनियमन करणाऱ्या कोणत्याही संलेखाच्या आवश्यकतांचे अनुपालन केलेले नाही, या कारणावरून हरकत घेतली जाणार नाही :

परंतु, अशा कंपनीच्या किंवा सहकारी संस्थेच्या घटनेसंबंधीचा संलेख, अशा कंपनीला किंवा सहकारी संस्थेला तसे करण्यास शक्ती प्रदान करीत नसेल अशा बाबतीत, या कलमातील कोणतीही गोष्ट कोणत्याही कंपनीला किंवा सहकारी संस्थेला कोणतेही कर्ज किंवा अग्रिम मिळवण्यास सहाय्यभूत होणार नाही.

**राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने आपले स्वत:चे रोखे किंवा ऋणपत्रे यापोटी कर्ज किंवा अग्रिमे न देणे.**

२३. राष्ट्रीय गृहनिर्माण बँक आपले स्वत:चे रोखे व ऋणपत्रे यांच्या प्रतिभूतींवर कोणतेही कर्ज किंवा अग्रिम देणार नाही.

**तपासणी करण्याची शक्ती.**

२४. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, कोणत्याही वेळी आणि रिझर्व्ह बँकेकडून तसे करण्याचे निदेशित करण्यात आल्यानंतर, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने जिला कोणतेही कर्ज किंवा अग्रिम किंवा अन्य कोणतेही वित्तीय सहाय्य दिले असेल अशा कोणत्याही गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेची किंवा तिची पुस्तके, लेखे व इतर दस्तऐवज यांची आपल्या एका किंवा अधिक अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करवून घेता येईल आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेला अशा तपासणीसंबंधीच्या आपल्या अहवालाची प्रत पुरवील.

(२) गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेच्या प्रत्येक अधिकाऱ्याने, कर्मचाऱ्याने किंवा तिच्या संपूर्ण कार्याची किंवा त्याच्या काही भागाची प्रभारी असलेल्या एका व्यक्तीने किंवा अनेक व्यक्तींनी, पोटकलम (१) अन्वये तपासणी करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला, आपल्या कब्जात व शक्तीच्या कक्षेत असलेली अशी सर्व पुस्तके, लेखे व इतर दस्तऐवज हजर करणे आणि उक्त अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेच्या कार्यासंबंधीची उक्त अधिकाऱ्याला आवश्यक असतील अशी कोणतीही विवरणपत्रे, माहिती सादर करणे हे अशा प्रत्येक अधिकाऱ्याचे, कर्मचाऱ्याचे किंवा इतर व्यक्तीचे/व्यक्तींचे कर्तव्य असेल.

**पतविषयक माहिती गोळा करण्याची शक्ती.**

२५. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, या अधिनियमाखालील आपली कामे कार्यक्षमतेने पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, ती बँक वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा स्वरूपात आणि अशा वेळात, कोणत्याही गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेने आपल्याला पतविषयक माहिती सादर करण्याबाबत कोणत्याही वेळी निदेश देता येईल.

(२) प्रत्येक गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्था, त्या काळापुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये किंवा तिची घटना विनियमित करणाऱ्या कोणत्याही संलेखात किंवा तिच्या घटक संस्थांबरोबरच्या तिच्या व्यवहारांच्या गुप्ततेसंबंधातील तिने केलेल्या कोणत्याही करारामध्ये तद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यास बांधलेली असेल.

(३) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, या अधिनियमाखालील आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र व राज्य शासने, स्थानिक प्राधिकरणे, रिझर्व्ह बँक, कोणतीही बँक किंवा यासंबंधात रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा अन्य वित्तीय किंवा इतर संस्था यांच्याकडून पतविषयक माहिती किंवा इतर माहिती गोळा करता येईल.

**स्पष्टीकरण.**—हे कलम व कलम २६ यांच्या प्रयोजनार्थ, पतविषयक माहिती याचा अर्थ, खालील संबंधातील कोणतीही माहिती, असा आहे :—

(एक) गृहनिर्माणाच्या प्रयोजनार्थ देण्यात आलेली कर्जे व अग्रिमे आणि इतर पतविषयक सुविधा ;

(दोन) अशी कर्जे, अग्रिमे किंवा इतर पतविषयक सुविधा यांसाठी घेतलेल्या प्रतिभूतींचे स्वरूप ;

(तीन) सादर केलेली हमी; आणि

(चार) कर्ज घेणाऱ्या व्यक्तीच्या पतपात्रतेसंबंधातील अन्य कोणतीही माहिती.

माहिती प्रकाशित करण्याची शक्ती. २६. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, तिला तसे करणे लोकहिताचे वाटत असेल तर, तिने या अधिनियमान्वये मिळविलेली कोणतीही पतविषयक माहिती किंवा अन्य माहिती, तिला योग्य वाटेल अशा एकत्रित स्वरूपात किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात, प्रकाशित करता येईल.

सल्लाविषयक सेवा. २७. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, केंद्र शासन व राज्य शासने, स्थानिक संस्था व गृहनिर्माणाशी संबंधित इतर अभिकरणे यांना, पुढील बाबतीत सल्लाविषयक सेवा देता येतील :—

(क) गृहनिर्माण व गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांच्या प्रवर्धनाचा उद्देश असलेल्या सर्वसाधारण धोरणांची आखणी;

(ख) निवारा, गृहनिर्माण व मानवी वसाहत यांवर भर असलेल्या बाबीसंबंधातील विधिविधान.

## प्रकरण पाच

### ठेवी स्वीकारणाऱ्या गृहनिर्माण वित्तीय संस्थांसंबंधीचे उपबंध

ठेवींची व्याख्या. २८. या प्रकरणामध्ये, "ठेव" या संज्ञेला, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या कलम ४५१ मध्ये जो अर्थ नेमून दिला आहे, तोच अर्थ असेल.

प्रकरण विवक्षित बाबतीत लागू होणार नाही. २९. (१) पेढी किंवा व्यक्तींचा अनिगमित अधिसंघ असलेल्या गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेकडून घेण्यात आलेल्या ठेवींना या प्रकरणाचे उपबंध लागू होणार नाहीत.

(२) शंकानिरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या पेढ्या आणि व्यक्तींचे अनिगमित अधिसंघ हे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या प्रकरण तीन ग च्या उपबंधाद्वारे नियंत्रित होणे चालू राहील.

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने, पैशाच्या ठेवींची अभ्यर्थना करणारे उद्देशपत्रक किंवा जाहिरात काढणे या गोष्टींचे विनियमन किंवा त्यास मनाई करणे. ३०. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे तिला आवश्यक वाटेल तर सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे,—

(क) कोणत्याही गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेला, जनतेकडून पैशाच्या ठेवींची अभ्यर्थना करणारे कोणतेही उद्देशपत्रक किंवा जाहिरात काढणे या गोष्टींचे विनियमन करता येईल किंवा त्यास मनाई करता येईल; आणि

(ख) मनाई करण्यात आली नाही तर असे कोणतेही उद्देशपत्रक किंवा जाहिरात ज्यांच्या अधीनतेने काढता येईल त्या शर्ती विनिर्दिष्ट करता येतील.

गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांकडून ठेवीसंबंधी माहिती गोळा करण्याची आणि निदेश देण्याची राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची शक्ती. ३१. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, कोणत्याही वेळी असे निदेशित करता येईल की, ठेवी स्वीकारणाऱ्या प्रत्येक गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेने, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्वरूपात अशा कालांतरांनी आणि अशा कालावधीत, गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांनी स्वीकारलेल्या ठेवींबाबतची किंवा त्यासंबंधातील अशी विवरणपत्रे, माहिती किंवा तपशील सादर करावे.

(२) पोटकलम (१) अन्वये राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेत निहित केलेल्या शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाधा न आणता, पोटकलम (१) अन्वये सादर करावयाची विवरणपत्रे, माहिती किंवा तपशील पुढील सर्व किंवा त्यांपैकी काही बाबींशी संबंधित असतील, त्या म्हणजे, ठेवींची रक्कम, अशा ठेवी ज्यासाठी आणि ज्या पुरत्या स्वीकारण्यात आल्या ती प्रयोजने आणि ते कालावधी आणि त्यांचे व्याजाचे दर व इतर अटी आणि शर्ती.

(३) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे तिला आवश्यक वाटले तर एकतर सर्वसाधारणतः ठेवी स्वीकारणाऱ्या गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांना किंवा ठेवी स्वीकारणाऱ्या गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांच्या कोणत्याही समूहाला, आणि विशेषतः ठेवी स्वीकारण्यासंबंधातील किंवा त्याबाबतच्या कोणत्याही बाबी तसेच अशा ठेवींवर देय असलेल्या व्याजाचे दर आणि ठेवी स्वीकारण्याचा कालावधी, याबाबत निदेश देता येतील.

(४) ठेवी स्वीकारणाऱ्या कोणत्याही गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेने, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने पोटकलम (३) अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली तर, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, त्या गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेकडून केल्या जाणाऱ्या ठेवींच्या स्वीकारास मनाई करता येईल.

(५) ठेवी स्वीकारणारी प्रत्येक गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्था, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून तसे करणे आवश्यक करण्यात आल्यानंतर आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँक विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत, गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेच्या खर्चाने, तिचा वार्षिक ताळेबंद आणि नफातोटयाचा हिशब किंवा इतर वार्षिक लेखे यांची प्रत, ज्यांच्याकडून गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्था, लेखे ज्या वर्षाचे आहेत त्याच्या शेवटच्या दिनांकास, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्यापेक्षा अधिक रकमेच्या ठेवी घेत असेल, अशा प्रत्येक व्यक्तीला पाठवण्याची व्यवस्था करील.

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून आवश्यक करण्यात आलेली विवरणपत्रे इ. सादर करणे हे गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थांचे कर्तव्य असणे.

३२. प्रत्येक गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्था, या प्रकरणाच्या उपबंधान्वये विहित करण्यात आलेल्या नमुन्यात आणि तिला देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन होईल अशा रीतीने, मागितलेली विवरणपत्रे, माहिती किंवा तपशील सादर करील.

लेखा परीक्षकांच्या शक्ती व कर्तव्ये.

३३. (१) प्रत्येक गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेचा लेखापरीक्षक, या प्रकरणान्वये आवश्यक करण्यात आलेली गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेने सादर करावयाची, तिने स्वीकारलेल्या ठेवींसंबंधीची विवरणपत्रे, माहिती किंवा तपशील सादर करण्यात आला आहे किंवा नाही याबद्दल चौकशी करील आणि लेखापरीक्षक, गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेने अशी विवरणपत्रे, माहिती किंवा तपशील सादर करण्यात आला आहे अशी खात्री झाली असेल त्याखेरीज इतर बाबतीत, गृहनिर्माण वित्त-व्यवस्था संस्थेकडून धारण करण्यात आलेल्या अशा एकूण ठेवींची रक्कम नमूद करून राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला अहवाल सादर करील.

(२) गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्था ही, कंपनी असेल अशा बाबतीत, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडे लेखापरीक्षकाने पोटकलम (१) अन्वये अहवाल सादर केला असेल किंवा सादर करण्याचा उद्देश असेल तेव्हा, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २२७ च्या पोटकलम (२) खालील आपल्या अहवालात तो राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडे त्याने सादर केलेल्या किंवा सादर करण्याचा उद्देश असलेल्या अहवालाचा मजकूर समाविष्ट करील.

निरीक्षण.

३४. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, तिला सादर करण्यात आलेले कोणतेही विवरणपत्र, माहिती किंवा तपशील यांची अचूकता किंवा पूर्णता पडताळून पाहण्याच्या प्रयोजनार्थ अथवा गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेने, तसे करण्यास सांगण्यात आल्यानंतर जी सादर करण्यात कसूर केली असेल अशी कोणतीही माहिती किंवा तपशील मिळवण्याच्या प्रयोजनार्थ, ठेवी स्वीकारणाऱ्या कोणत्याही गृहनिर्माण वित्तव्यवथा संस्थेची, कोणत्याही वेळी, आपल्या एका किंवा त्याहून अधिक अधिकाऱ्यांमार्फत अथवा कर्मचाऱ्यांमार्फत किंवा इतर व्यक्तींमार्फत (यात यापुढे निरीक्षण प्राधिकारी म्हणून निर्देशिलेल्या) निरीक्षण करून घेण्याची व्यवस्था करता येईल.

(२) प्रत्येक गृहनिर्माण संस्थेच्या कोणत्याही समितीचा किंवा इतर निकायाचा प्रत्येक संचालक किंवा सदस्य अथवा तिच्या संपूर्ण कार्याच्या किंवा त्याच्या भागाच्या व्यवस्थापनामध्ये त्या काळापुरती निहित असलेली कोणतीही व्यक्ती किंवा तिचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी, याने निरीक्षण प्राधिकाऱ्याला, त्या प्राधिकाऱ्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत, संस्थेच्या कामकाजाशी संबधित अशी त्या प्राधिकाऱ्याकडून आवश्यक करण्यात येईल अशी त्याच्या अभिरक्षेतील किंवा शक्तीतील सर्व पुस्तके, लेखे व इतर दस्तऐवज हजर करणे आणि कोणतेही विवरणपत्र व माहिती पुरवणे, हे त्याचे कर्तव्य असेल.

(३) निरीक्षण प्राधिकाऱ्याला, ठेवी स्वीकारणाऱ्या गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेच्या कोणत्याही समितीचा किंवा निकायाचा कोणताही संचालक किंवा सदस्य अथवा तिच्या कामकाजाच्या व्यवस्थापना-मध्ये त्या काळापुरती निहित असलेली अन्य कोणतीही व्यक्ती अथवा तिचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी याची, तिच्या व्यवसायासंबंधात शपथेवर तपासणी घेता येईल.

अनधिकृत व्यक्तींना ठेवींची अभ्यर्थना करता येणार नाही.

३५. कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेच्या वतीने, कोणतेही उद्देशपत्रक किंवा जाहिरात प्रकाशित करून किंवा प्रकाशित करण्याची व्यवस्था करून किंवा अन्य कोणत्याही रीतीने, जनतेकडून—

(क) उक्त गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेकडून तिला तसे करण्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याखेरीज आणि तिला अशा रीतीने प्राधिकृत करणाऱ्या संस्थेचे नाव तिने विनिर्दिष्ट केल्याखेरीज; आणि

(ख्) उद्देशपत्रक किंवा जाहिरात, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून कलम ३० अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे आणि असे उद्देशपत्रक किंवा जाहिरात यांच्या प्रकाशनाला त्या त्या वेळी लागू असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या अन्य कोणत्याही उपबंधाचे अनुपालन झालेले असल्याखेरीज;

पैशांच्या ठेवींची अभ्यर्थना करता येणार नाही.

प्रकरण पाच हे इतर कायद्यांवर अधिभावी ठरणे.

३६. या प्रकरणाचे उपबंध, त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात किंवा अशा कोणत्याही कायद्याच्या आधारे प्रभाव असलेल्या कोणत्याही संलेखात काहीही विसंगत अंतर्भूत असले तरी, अधिभावी ठरतील.

## प्रकरण सहा

### निधी, लेखे व लेखापरीक्षा

सर्वसाधारण निधी व इतर निधी.

३७. (१) रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, "सर्व साधारण निधी" असे संबोधले जाणारा निधी स्थापन करील आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून केली जाणारी प्रदाने उक्त सर्वसाधारण निधीतून केली जातील.

(२) रिझर्व्ह बँकेकडून तसे निदेशित करण्यात आल्यास, मंडळाला विशेष निधी किंवा राखीव निधी किंवा विहित करण्यात येईल त्यानुसार असे इतर निधी निर्माण करता येतील व मंडळ ते निर्माण करील.

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे ताळेबंद इ. तयार करणे.

३८. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे ताळेबंद व लेखे विहित करण्यात येईल अशा स्वरूपात व रीतीने तयार करण्यात व ठेवण्यात येतील.

(२) मंडळ, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची पुस्तके व लेखे यांचे प्रतिवर्षी तीस जून रोजी असल्याप्रमाणे ताळेबंद करण्याची व ते बंद करण्याची व्यवस्था करवील.

अधिशेषाची व्यवस्था लावणे.

३९. बुडित व शंकास्पद ऋणे, मत्तेचा घसारा आणि ज्यासाठी उपबंध आवश्यक किंवा उचित आहे किंवा ज्यावद्दल बँक व्यवसायींकडून सर्वसाधारणतः उपबंध करण्यात येतो अशा इतर बाबी यासाठी उपबंध केल्यानंतर, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक,—

(एक) ती ज्या वर्षात स्थापन झाली त्या लेखांकन वर्षानंतर येणाऱ्या पंधरा वर्षांच्या कालावधीसाठी, रिझर्व्ह बँक विनिर्दिष्ट करील अशी कलम ३७ मध्ये उल्लेखिलेल्या निधींची उर्वरित (या कलमात यापुढे अधिशेष म्हणून उल्लेखिलेली) रक्कम, हस्तांतरित करील; आणि

(दोन) उक्त पंधरा वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, कलम ३७ मध्ये उल्लेखिलेल्या निधींसाठी उपबंध केल्यानंतर अधिशेषाची शिल्लक रिझर्व्ह बँकेकडे हस्तांतरित करील.

लेखापरीक्षा.

४०. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या लेख्यांची लेखापरीक्षा, कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २२६ च्या पोटकलम (१) अन्वये लेखापरीक्षक या नात्याने यथोचित अर्हताप्राप्त अशा, रिझर्व्ह बँक निश्चित करील अशा अटींवर व मोबदल्यावर त्या बँकेकडून नियुक्ती करण्यात येईल त्या लेखापरीक्षकांकडून केली जाईल.

(२) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या वार्षिक ताळेबंदाची प्रत लेखापरीक्षकांना पुरवण्यात येईल आणि त्याच्याशी संबंधित लेखे व प्रमाणके यांच्यासह त्यांची तपासणी करणे हे त्यांचे कर्तव्य असेल आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने ठेवलेल्या सर्व पुस्तकांची सूची त्यांना देण्यात येईल आणि राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेची सर्व पुस्तके, लेखे, प्रमाणके व इतर दस्तऐवज सर्व वाजवी वेळी त्यांना पाहण्यास मिळतील.

(३) लेखापरीक्षकांना राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या लेख्यांच्या संदर्भात, मंडळाचा कोणताही संचालक किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांची लेख्यांच्या संबंधात तपासणी करता येईल आणि त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यांना आवश्यक वाटेल अशी माहिती व स्पष्टीकरण, मंडळ किंवा अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांच्याकडे मागवण्यास ते हक्कदार असतील.

(४) लेखापरीक्षक, त्यांनी तपासणी केलेला वार्षिक ताळेबंद व लेखे यासंबंधातील अहवाल राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला सादर करतील आणि अशा प्रत्येक अहवालामध्ये, त्यांच्या मते, राष्ट्रीय गृहनिर्माण मंडळाच्या सद्यःस्थितीचे वास्तव व रास्त स्वरूप दिसून येईल अशा रीतीने सर्व आवश्यक तपशील अंतर्भूत असणारा व व्यवस्थितरीत्या तयार केलेला संपूर्ण व रास्त ताळेबंद आहे किंवा कसे आणि मंडळाकडून किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण मंडळाचा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांच्याकडून त्यांनी कोणतेही स्पष्टीकरण किंवा माहिती मागविली असल्यास, ती दिली आहे किंवा कसे आणि ती समाधानकारक आहे किंवा कसे ते नमूद करण्यात येईल.

(५) राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, केंद्र शासनाला व रिझर्व्ह बँकेला, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे वार्षिक लेखे बंद व संतुलित केले जातील त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, संबद्ध वर्षाच्या अखेरीस असलेल्या तिच्या ताळेबंदाची प्रत, त्याचबरोबर त्या वर्षाच्या नफातोटयाच्या लेख्याची प्रत व लेखा-परीक्षकांच्या अहवालाची व वर्षभरातील राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या कामकाजाच्या अहवालाची प्रत, सादर करील आणि केंद्र शासन, त्याला या प्रती मिळाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, त्या संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

(६) पूर्ववर्ती पोटकलमांमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीला बाध न आणता, केंद्र शासनाला, कोणत्याही वेळी, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या लेख्यांच्या तपासणीसाठी आणि त्यावर अहवाल देण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांची नियुक्ती करता येईल आणि अशी तपासणी व अहवाल यासंबंधात त्याने केलेला खर्च राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना प्रदेय असेल.

४१. राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, रिझर्व्ह बँकेकडून आवश्यक करण्यात येतील अशी विवरणे व माहिती रिझर्व्ह बँकेला वेळोवेळी पुरवील. **विवरणे.**

४२. राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, देशातील गृहनिर्माणाचा कल व प्रगती यासंबंधातील अहवाल केंद्र शासन व रिझर्व्ह बँक यांना सादर करील आणि गृहनिर्माणाच्या विकासासंबंधी तिला आवश्यक व उचित वाटतील अशा सूचना त्या अहवालात करता येतील आणि केंद्र शासन, त्याला अहवाल मिळताच, शक्य तितक्या लवकर, तो संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्याची व्यवस्था करील. **गृहनिर्माणावरील वार्षिक अहवाल.**

## प्रकरण सात

### संकीर्ण

४३. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी तिला आवश्यक किंवा इष्ट वाटतील इतक्या संख्येतील अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल आणि त्यांची नियुक्ती व सेवा यासंबंधीतील अटी व शर्ती निश्चित करता येतील. **राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचा कर्मचारी वर्ग.**

(२) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे अधिकारी व कर्मचारी वर्गातील इतर व्यक्ती यांची कर्तव्ये व आचार, सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांच्या लाभार्थ भविष्यनिर्वाह निधी किंवा अन्य कोणताही निधी स्थापन करणे व तो ठेवणे, विहित करण्यात येईल त्यानुसार असेल.

(३) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, आपला कोणताही अधिकारी किंवा कर्मचारीवर्गातील कोणतीही व्यक्ती, बँक ठरवील अशा कालावधीपुरते आणि अशा अटी व शर्ती यांवर गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेसह कोणत्याही संस्थेकडे प्रतिनियुक्तीवर पाठवता येईल.

(४) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, आपल्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचारीवर्गातील कोणत्याही व्यक्तीला, अशा प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी, ती ज्यांस हक्कदार असेल असे कोणतेही वेतन, वित्तलब्धी किंवा इतर शर्ती व अटी यांपेक्षा कमी अनुकूल असेल किंवा असतील अशा शर्तींवर व अटींवर, वेतनावर, वित्तलब्धींवर कोणत्याही संस्थेकडे प्रतिनियुक्तीवर पाठवण्याची शक्ती प्रदान केली जाणार नाही.

(५) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याच्या कलम ५४कक च्या उपबंधास बाध न आणता, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या हितासाठी, तिला आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी आणि अशा अटींवर, शर्तींवर, गृहनिर्माण वित्तव्यवस्था संस्थेसह कोणत्याही संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा इतर कर्मचाऱ्याचा प्रतिनियुक्तीवर स्वीकार करता येईल किंवा प्रतिनियुक्तीवर घेता येईल.

४४. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, या अधिनियमाद्वारे किंवा अन्य कोणत्याही कायद्याद्वारे अन्यथा आवश्यक करण्यात आल्याखेरीज कायदा किंवा प्रथा यानुसार अथवा बँकसंचा परिपाठ किंवा रूढी यानुसार राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला आपल्या घटकांसंबंधातील किंवा त्यांच्या कार्यासंबंधातील कोणत्याही माहितीचा गौप्यस्फोट करणे आवश्यक किंवा उचित असेल अशा परिस्थितीखेरीज, कोणत्याही माहितीचा गौप्यस्फोट करणार नाही. **प्रामाणिकता व गुप्तता याबाबतचे आबंधन.**

(२) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचा किंवा या अधिनियमाच्या उपबंधानुसार राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून जिच्या सेवेचा उपयोग केला जातो त्या रिझर्व्ह बँकेचा प्रत्येक संचालक, समितीचा सदस्य, लेखा परीक्षक, सल्लागार, अधिकारी किंवा इतर कर्मचारी, आपले कर्तव्य हाती घेण्यापूर्वी, या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीत घालून दिलेल्या नमुन्यात प्रामाणिक व गुप्तता याबाबतचे प्रतिज्ञापन करील.

**नियुक्तीमधील दोषांमुळे कृती इ. विधिबाह्य ठरणार नाहीत.**

४५. (१) मंडळाची, किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या कोणत्याही समितीची, कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ मंडळाच्या, किंवा प्रकरणपरत्वे, समितीच्या रचनेमधील कोणतेही पद रिकामे आहे किंवा तीत कोणताही दोष आहे, या कारणास्तव प्रश्नास्पद केली जाणार नाही.

(२) मंडळाचा संचालक किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या समितीचा सदस्य म्हणन सद्भावपूर्वक कार्य करणाऱ्या व्यक्तीकडून करण्यात आलेली कोणतीही कृती, केवळ तो संचालक म्हणून अनर्ह ठरवण्यात आला किंवा त्याच्या नियुक्तीमध्ये अन्य कोणताही दोष होता या कारणावरून, विधिबाह्य ठरणार नाही.

**या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.**

४६. राष्ट्रीय गृहनिर्माण बँक किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचा कोणताही संचालक, किंवा अन्य अधिकारी किंवा इतर कर्मचारी अथवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून या अधिनियमाखालील कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांच्या विरुद्ध, या अधिनियमाच्या किंवा अन्य कोणत्याही कायद्याच्या किंवा कायद्याचे बळ असलेल्या उपबंधाच्या अनुपालनार्थ तिने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेली किंवा होण्याची शक्यता असलेली कोणतीही हानी किंवा नुकसान याबद्दल कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

**संचालकाचे हानी–रक्षण.**

४७. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून, प्रत्येक संचालकाचे, तो आपले कर्तव्य पार पाडीत असताना किंवा त्यासंबंधात त्याने स्वतःच्या बुद्धिपुरःसर कृतीमुळे किंवा कसुरीमुळे करून घेतलेल्या हानी खेरीज, त्याच्या झालेल्या सर्व हानीचे व खर्चाचे, हानी–रक्षण केले जाईल.

(२) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचा अन्य कोणताही संचालक, किंवा अन्य अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांस अथवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या वतीने संपादित केलेल्या किंवा घेण्यात आलेल्या कोणत्याही संपत्तीच्या किंवा प्रतिभूतीच्या मूल्याच्या किंवा हक्काच्या कोणत्याही अपुरेपणामुळे किंवा उणीवेमुळे अथवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या आबंधनाखालील कोणताही ऋणको किंवा कोणतीही व्यक्ती याच्या नादारीमुळे किंवा गैरकृत्यांमुळे अथवा त्यासंबंधातील आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडीत असताना सद्भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीमुळे, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला होणाऱ्या कोणत्याही हानीस किंवा खर्चास संचालक जबाबदार असणार नाही.

**प्राप्तीवरील करापासून सूट.**

४८. प्राप्ती अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) किंवा प्राप्ती, नफा किंवा लाभ यांवरील करासंबंधीची त्या-त्या वेळी अंमलात असलेली कोणतीही अधिनियमिती यामध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक आपली मिळविलेली प्राप्ती, नफा किंवा लाभ यासंबंधातील कोणताही प्राप्ती कर किंवा अन्य कोणताही कर भरण्यास दायी असणार नाही.

**शास्ती.**

४९. (१) जो कोणी, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये किंवा त्यांच्या कोणत्याही उपबंधाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या किंवा पुरवण्यात आलेल्या कोणत्याही विवरणात, ताळेबंदात किंवा अन्य दस्तऐवजात वा कोणत्याही माहितीमध्ये ते खोटे आहे हे माहीत असताना, कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलात हेतुपुरःसर खोटे विधान करतो अथवा महत्त्वाचे विधान करण्याचे हेतुपुरःसर टाळतो त्याला तीन वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या उपबंधान्वये जे हजर करणे किंवा पुरवणे हे तिचे कर्तव्य असताना, तिने असे कोणतेही पुस्तक, लेखा किंवा इतर दस्तऐवज हजर करण्यात किंवा कोणतेही विवरण वा माहिती पुरवण्यात कसूर केली तर तिला प्रत्येक अपराधाबद्दल दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाची आणि तशी कसूर करण्याचे चालू राहिल्यास अशा पहिल्या कसुरीच्या दोष सिद्धीनंतर कसूर करणे चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल अशा अतिरिक्त द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) जर कोणत्याही व्यक्तीने—

(क) प्रकरण पाच खाली दिलेल्या कोणत्याही निदेशाचे किंवा काढलेल्या आदेशाचे व्यतिक्रमण करून कोणतीही ठेव स्वीकारली ; किंवा

(ख) कलम ३५, किंवा प्रकरणपरत्वे, कलम ३० खालील कोणताही आदेश यानुसार अन्यथा कोणतेही उद्देशपत्रक किंवा जाहिरात काढली ;

तर तिला तीन वर्षांपर्यंत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि ती,—

(एक) खंड (क) खालील व्यतिक्रमणांच्या बाबतीत, स्वीकारलेल्या ठेवीच्या दुप्पट रकमेइतक्या ; आणि

(दोन) खंड (ख) खालील व्यतिक्रमणाच्या बाबतीत, उद्देशपत्रकाद्वारे किंवा जाहिरातीद्वारे मागवलेल्या ठेवीच्या दुप्पट रकमेइतक्या ;

द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र असेल.

(४) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करण्यात आले अथवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही आवश्यकतेचे किंवा त्याखाली केलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशांचे विनियमांचे किंवा निदेशाचे अथवा त्याखाली लादण्यात आलेल्या अटीचे अनुपालन करताना कोणतीही

कसूर करण्यात आली, तर अशा व्यतिक्रमणाबद्दल किंवा कसुरीबद्दल दोषी असणारी कोणतीही व्यक्ती, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या आणि असे व्यतिक्रमण किंवा कसूर करण्याचे चालू राहिल्यास पहिल्या व्यतिक्रमणानंतर किंवा कसुरीनंतर ते चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल अशा आणखी द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

५०. (१) कंपनीने अपराध केला असेल त्या बाबतीत, अपराध करण्यात आला त्यावेळी कंपनीची प्रभारी आणि कंपनीच्या धंद्याच्या चालनास, तसेच कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती आणि ती कंपनी अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार त्या विरुद्धच्या कार्यवाहीस व शिक्षेस पात्र असेल : **कंपन्यांचे अपराध**

परंतु, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती, अपराध आपल्या नकळत घडला किंवा अशा अपराधास प्रतिबंध करण्यासाठी आपण, साक्षेपाने प्रयत्न केला असे तिने सिद्ध केले तर, या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र असणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कोणत्याही कंपनीकडून करण्यात आला असेल आणि तो कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूक संमतीने करण्यात आला असेल किंवा त्यांच्या निष्काळजी-पणापोटी झाला असेल तर असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीही अशा अपराधा-बद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा होण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, निगमनिकाय, असा आहे व त्यामध्ये पेढी किंवा व्यक्तींचा अधिसंघ यांचा समावेश होतो ; आणि

(ख) पेढीच्या संबंधातील "संचालक" याचा अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे.

५१. (१) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून या संबंधात सर्वसाधारणतः किंवा विशेषतः प्राधिकृत करण्यात आलेल्या राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून लेखी तक्रार करण्यात आल्या-खेरीज कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची दखल घेणार नाही आणि महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालय किंवा त्यापेक्षा वरिष्ठ न्यायालय याखेरीज कोणतेही न्यायालय अशा कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही. **अपराधाची दखल.**

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दंडाधिकारी, त्याला तसे करण्यास कारण असेल तर, तक्रार दाखल करून राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या अधिकाऱ्याच्या प्रत्यक्ष उपस्थितीविना भागवू शकेल. परंतु दंडाधिकारी, त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याच्या वेळी, फिर्यादीच्या प्रत्यक्ष उपस्थितीचा निदेश देऊ शकेल.

५२. या अधिनियमान्वये कोणताही द्रव्यदंड बसविणाऱ्या न्यायालयाला असे निदेशित करता येईल की, तो संपूर्ण द्रव्यदंड किंवा त्याचा कोणताही अंश हा, कार्यवाहीच्या खर्चाच्या कामी किंवा खर्चाच्या प्रदानाकडे उपयोजित केला जावा. **द्रव्यदंडाचे उपयोजन.**

५३. बँक व्यवसायींची पुस्तके पुरावा अधिनियम, १८९१ (१८९१ चा १८) हा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या संदर्भात, ती त्या अधिनियमाच्या कलम २ मध्ये व्याख्या केलेली बँक असल्याप्रमाणे लागू होईल. बँक व्यवसायींची पुस्तके, पुरावा अधिनियम, १८९१ राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या संदर्भात लागू होणे.

५४. कंपन्यांच्या परिसमापनासंबंधीच्या कायद्याचा कोणताही उपबंध राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला लागू होणार नाही आणि केंद्र शासनाचा आदेश आणि ते निदेशित करील अशी रीत यांखेरीज राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे समापन होणार नाही. राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे समापन.

५५. (१) मंडळाला, रिझर्व्ह बँकेच्या पूर्वमान्यतेने आणि केंद्र शासनाशी विचारविनिमय करून, अधिसूचनेद्वारे या अधिनियमाचे उपबंध परिणामक करण्यासाठी, ज्यांच्या संबंधात उपबंध करणे आवश्यक किंवा इष्ट असेल अशा बाबींसाठी उपबंध करण्याकरिता या अधिनियमाशी विसंगत असे विनियम करता येतील. विनियम करण्याची मंडळाची शक्ती.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा विनियमात खालील सर्व किंवा त्यांपैकी काही बाबींसाठी उपबंध करता येतील, त्या अशा :—

(क) मंडळाच्या किंवा त्याच्या समित्यांच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी संचालकांना कलम ७ च्या पोटकलम (५) अन्वये देता येईल अशी फी व भत्ते ;

(ख) मंडळाच्या बैठकी घेण्याच्या वेळा व ठिकाणे, आणि कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये कामकाजाच्या व्यवहारासंबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ग) कार्यकारी समितीतील आवश्यक सदस्य संख्या, तिने पार पाडावयाची कर्तव्ये आणि त्यांच्या बैठकीची ठिकाणे आणि कलम १२ खालील कामकाजाच्या व्यवहारासंबंधात तिने अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचे नियम ;

(घ) कलम १५ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये बंधपत्रे व ऋणपत्रे, काढण्याची व त्यांच्या विमोचनाची रीत व अटी ;

(ङ) कलम १६ च्या पोटकलम (१) अन्वये राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला परकीय चलन ज्या रीतीने आणि ज्या शर्तीच्या अधीनतेने उसने घेता येईल ती रीत व त्या शर्ती ;

(च) कलम ३२ अन्वये पुरवावयाची विवरणपत्रे, माहिती, इत्यादींचा नमुना ;

(छ) कलम ३७ च्या पोटकलम (२) अन्वये निर्माण करावयाचा विशेष निधी, राखीव निधी व इतर निधी ;

(ज) कलम ३८ च्या पोटकलम (१) अन्वये तयार करावयाचा व ठेवावयाचा ताळेबंद व लेखे यांचा नमुना व पद्धती ;

(झ) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे अधिकारी व कर्मचारी वर्गातील इतर व्यक्ती यांची कलम ४३ खालील कर्तव्ये व वर्तन, वेतन, भत्ते आणि सेवा शर्ती ;

(ञ) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचे अधिकारी व कर्मचारी वर्गातील व्यक्ती यांच्या लाभासाठी कलम ४३ अन्वये भविष्यनिर्वाह निधी व अन्य कोणताही निधी यांची स्थापना व परिरक्षण ;

(ट) विहित करण्यात येईल किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये मंडळाकडून करण्यात येईल असा कोणताही विनियम, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या स्थापनेच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी केंद्र शासनाशी विचारविनिमय केल्यानंतर, रिझर्व्ह बँकेकडून करण्यात येईल आणि अशा रीतीने करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमात मंडळाला या अधिनियमाखालील त्यांच्या शक्तींचा वापर करून, बदल करता येईल किंवा तो विखंडित करता येईल.

(४) या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या विनियम करण्याच्या शक्तीमध्ये, विनियमांना किंवा त्यापैकी कोणत्याही विनियमाला या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वीचा नसेल अशा दिनांकापासून भूतलक्षी प्रभाव देण्याच्या शक्तीचा समावेश होतो, परंतु असा विनियम ज्या व्यक्तीला लागू होण्याजोगा असेल तिच्या हितसंबंधावर बाधक परिणाम होईल अशा रीतीने कोणत्याही विनियमाला भूतलक्षी प्रभाव दला जाणार नाही.

(५) केंद्र शासन, या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक विनियम, [1][किंवा योजना] तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, त्याचे सत्र चालू असताना, एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी ठेवण्याची व्यवस्था करील आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या विनियमात [1][किंवा योजनेत] कोणताही बदल करण्याबाबत किंवा बदल न करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो विनियम [1][किंवा योजना] अशा बदललेल्या स्वरूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही बदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींचा विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**विवक्षित अधिनियमितीचे विशोधन.** ५६. या अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमती, त्यांमध्ये उपबंधित केलेल्या रीतीने विशोधित केल्या जातील आणि त्या अनुसूचीमध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्याखेरीज, अशी विशोधने, कलम ३ अन्वये राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या स्थापनेच्या दिनांकी आणि दिनांकापासून परिणामक होतील.

**अडचणी दूर करण्याची शक्ती.** ५७. या अधिनियमाचे उपबंध परिणामक करण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र शासनाला या अधिनियमांच्या उपबंधांना विसंगत नसलेल्या आदेशाद्वारे अडचणी दूर करता येतील :

परंतु, असा कोणताही आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर दिला जाणार नाही.

---

१. १९९१ चा अधिनियम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

## पहिली अनुसूची

[ पहा कलम ४४(२) ]

### प्रामाणिकता व गुप्तता यांचे प्रतिज्ञापन

मी, .............................. याद्वारे असे प्रतिज्ञापन करतो की, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेचा संचालक, .................. समितीचा सदस्य, लेखापरीक्षक, सल्लागार, अधिकारी किंवा, (प्रकरणपरत्वे) इतर कर्मचारी या नात्याने माझ्याकडून अपेक्षित आणि उक्त राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेतील किंवा बँकेसंबंधातील माझ्या पदाशी किंवा दर्जाशी यथोचितपणे संबंधित असलेली कर्तव्ये निष्ठापूर्वक खरोखर आणि माझे कौशल्य व सामर्थ्य पणाला लावून पूर्ण करीन व पार पाडीन.

मी, आणखी असे प्रतिज्ञापन करतो की, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या कामकाजाशी संबंधित अशी कोणतीही माहिती मिळण्यास विधितः हक्कदार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला ती कळविणार नाही किंवा कळवू देणार नाही अथवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या मालकीची किंवा तिच्या ताब्यात असलेली आणि उक्त राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या व्यवसायाशी किंवा उक्त राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेशी व्यवहार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या व्यवसायाशी संबंधित कोणतीही पुस्तके किंवा दस्तऐवज तपासण्यास किंवा पाहावयास परवानगी देणार नाही.

माझ्या समक्ष सही केली. (सही)

---

## दुसरी अनुसूची

[पहा कलम ५६]

### विवक्षित अधिनियमितीची विशोधने

#### भाग एक

#### भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४

(१९३४ चा २)

#### विशोधने

१. कलम २ मध्ये, खंड (गगग) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल, तो असा,—

" (गगगग) " राष्ट्रीय गृहनिर्माण बँक " याचा अर्थ, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ च्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, असा आहे; ".

२. कलम १७ मध्ये,—

(एक) खंड (४घ) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल, तो असा,—

" (४घघ) केंद्रीय मंडळ निश्चित करील अशा रीतीने व अशा अटींवर राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला कर्ज व अग्रिम देणे व राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला सर्वसाधारणपणे सहाय्य करणे; "

(दोन) खंड ४छ नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल तो असा,—

" (४छछ) कलम ४६घ अन्वये स्थापन झालेल्या राष्ट्रीय गृहनिर्माण पत (दीर्घ मुदती व्यवहार) निधीतून राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला कर्ज व अग्रिम देणे आणि तिचे रोखे व ऋणपत्रे खरेदी करणे ;"

(तीन) खंड (८क) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल, तो असा,—

" (८कक) कोणत्याही वित्त संस्थेला, आपली दुय्यम संस्था म्हणून किंवा अन्यथा, प्रवर्धित करणे, तिची स्थापना करणे, तिला आधार देणे किंवा तिचे प्रवर्धन करण्यात, स्थापना करण्यात आणि आधार देण्यात सहाय्य करणे; ".

H 4285

३. कलम ४२ च्या पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणामधील, खंड (ग) च्या उपखंड (दोन) मध्ये, "पुनर्निर्माण बँकेकडून" या शब्दानंतर "किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

राष्ट्रीय गृहनिर्माण बँक (दीर्घ मुदती व्यवहार) निधी.

४. कलम ४६ ग नंतर खालील कलम समाविष्ट करण्यात येईल, ते असे,—

"४६घ. (१) बँक, राष्ट्रीय गृहनिर्माण पत (दीर्घ मुदती व्यवहार) निधी नावाचा एक निधी स्थापन करील व ठेवील आणि त्यात प्रत्येक वर्षी तिला आवश्यक वाटतील अशा रकमा जमा करील.

(२) उक्त निधीमधील रक्कम फक्त खालील उद्देश्यांसाठीच बँकेद्वारे वापरली जाईल, ते असे,—

(क) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या कोणत्याही धंद्याच्या प्रयोजनासाठी, राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेला कर्ज व अग्रिम देणे;

(ख) राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेने काढलेले रोखे व ऋणपत्रे खरेदी करणे".

## भाग दोन

## बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९
## (१९४९ चा १०)

(विशोधने)

१. कलम ५ मध्ये, खंड (चच्ग्) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल, तो असा :—

"(चच्घ्) "राष्ट्रीय गृहनिर्माण बँक" याचा अर्थ, राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली राष्ट्रीय गृहनिर्माण बँक, असा आहे".

२. कलम १८ च्या पोटकलम (१) मधील खंड (क्) च्या उप-खंड (दोन) मधील स्पष्टीकरणामध्ये, "किंवा पुनर्निर्माण बँकेकडून" या शब्दानंतर "किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडन" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

३. कलम ३४क च्या पोटकलम (३) मध्ये "पुनर्निर्माण बँक" या शब्दानंतर "राष्ट्रीय गृहनिर्माण बँक" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

४. कलम ३६कध च्या पोटकलम (३) मध्ये "पुनर्निर्माण बँक" या शब्दानंतर "राष्ट्रीय गृहनिर्माण बँक" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

५. कलम ५६ मधील खंड (ञ्) खाली, खंड (क्) च्या उप-खंड (दोन) च्या स्पष्टीकरणामध्ये "पुनर्निर्माण बँक" या शब्दानंतर "राष्ट्रीय गृहनिर्माण बँक" हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

---

## भाग तीन

## औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७
## (१९४७ चा १४)

(विशोधने)

कलम २ च्या खंड (क्) च्या उप-खंड (एक) मध्ये "भारतीय औद्योगिक पुनर्निर्माण बँक" या मजकुरानंतर "राष्ट्रीय गृहनिर्माण बँक अधिनियम, १९८७ च्या कलम ३ अन्वये स्थापन झालेली राष्ट्रीय गृहनिर्माण बँक" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

---

## भाग चार

## बोनस प्रदान अधिनियम, १९६५
## (१९६५ चा २१)

(विशोधने)

कलम ३२ च्या खंड (नऊ) च्या उप-खंड (च्) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येईल, तो असा :—

"(चच्) राष्ट्रीय गृहनिर्माण बँक; ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई